BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

तृतीयपंथीयांच्या जन्मामागील जैविक व सामाजिक कारणांचा अभ्यास

निहाटे रूपेश रमेश

संशोधक

Email : inspire9764@gmail.com

समाजशास्त्र विभाग, मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव

डॉ. बडगे सागर लोकनाथ

मार्गदर्शक

समाजशास्त्र विभाग प्रमुख, मू. जे. महाविद्यालय (स्वायत्त), जळगाव

सारांश (Abstract) :-

मानवाला जन्म घेण्याचे स्वातंत्र नाही, तसे असते तर तृतीयपंथी समाज उदयास आलेला नसता. निसर्गाने जन्मतः स्त्रि व पुरूष या दोघांना सामाजिक मान्यता दिलेली आहे. परंतू तृतीयपंथी यांची ओळख उपेक्षित घटकामध्येच केली जाते. एखादया कुटूंबात तृतीयपंथी बाळ जन्माला जर आलेच तर ती सत्यता समाजाला सांगण्याची हिंम्मत त्या कुटूंबाला येईल काय? त्याच कुटूंबात व समाजात त्याला दुय्यम स्थान, हिन वागणूक का दिली जाते. गुणसुत्रातील जनुकांच्या बदलामुळे जनन प्रक्रियामध्ये जे बदल होतात व त्यामुळे तृतीयपंथी बाळ जन्माला येतात. Biological Sex, Gender Identity आणि Sexual Orientation म्हणजे जन्माच्या वेळी जे काही जन्मलेल्या मुलांचे जनांग असतात त्यावरून तो मुलगा आहे की मुलगी ठरविली जाते. Biological Sex म्हणजे बाहय जनांगावरून ठरविण्यात आलेले व्यक्तीचे लिंग. यामध्ये ढोबळ मानाने तिन प्रकार पडतात स्त्रि, पुरूष आणि इंटरसेक्स. इटरसेक्स म्हणजे बाळाचे बाहय सेक्स ऑर्गन्सहून स्पष्ट होत नसतात की तो स्त्रि आहे की पूरूष.

इंटरसेक्स ही एक मेडीकल शारिरीक ऑबनॉर्मलिटी असते. ज्यात बाळाचे सेक्स ऑर्गन्स जन्मतः मुलांचे आहेत की मुलींचे आहेत ते स्पष्ट ओळखायला येत नसतात. त्याची एक तर वाढ पुर्ण झालेली नसते. मुलांच्या किंवा मुलींच्या “क्लिटोरिस” नावाचा अवयव जास्तीचा वाढलेला असतो, आणि बाकीच्या अवयवांची वाढ अपूर्ण असते त्यामुळे तृतीयपंथी बाळ जन्माला येवू शकते ही शक्यता नाकारता येत नाही. (धुमाळ, 2023)

2021 सालातील IPSOS हया संशोधन संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात 3% समलैंगिक, 9% उभयलैंगिक BISEXUAL] 1.6% पारलिंगी TRANSGENDER, अर्थात एक हजारात एक ते सहा, 1% PANSEXUAL] 2% लैंगिक भावना नसलेले ASEXUAL व 69% विरूध्द लिंगाबद्दल आकर्षण असणारे सामान्य लोक आहेत. काही लोकांना आपण नक्की कुठल्या प्रकारात आहोत हे कळलेले नाही किंवा ते उत्तर देऊ इच्छित नाहीत. (कुलकर्णी, 2023)

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

कि वर्ड **(Keywords) :-** तृतीयपंथी, गुणसुत्र, लैगिंक विविधता, जनुके, जैविक बदल, क्रोमोसोम.

प्रस्तावना **(Introduction) :**

तृतीयपंथी यांच्या जन्माचे कारण एकाच घटकावर अवलंबून नूसन ते जैविक (Biological)] मानसिक (Psychological)] आणि सामाजिक (Social)] घटकांच्या गुंतागुतीच्या आंतरक्रियेतून निर्माण होते. मानवजातीतील गुणसुत्रांची संख्या 46 आहे, त्यापैकी 44 ऑटोसेम आहेत तर उर्वरीत दोन लैंगिक गुणसुत्र आहेत. हे दोन क्रोमोसोम XY असतील तर त्याला पुरूष म्हणतात तर XX असतील तर स्त्रि म्हणतात. XY आणि XX या गुणसुत्राव्यतिरीक्त PXXX] YY] OX गुणसुत्रांना मानवामध्ये हे गुणसुत्र विकार म्हणतात. ज्याला सामान्य भाषेत हिजडा, किन्नर, सहा, नपुंसक, गुड, मामू, षंढ, बायल्या, थर्ड जेंडर, गे, द्विलिंगी, मनोरूग्ण, विकृत मंदबुध्दी असेही म्हणतात.

जेव्हा मुल आईच्या पोटात वाढत असते तेव्हा काही कारणांमुळे गुणसुत्रांच्या संख्येत वाढ किंवा गुणसुत्राच्या आकारात बदल होतो तेव्हा मुले/मुली तृतीयपंथी म्हणून जन्माला येतात.

इंटरसेक्स व्यक्तीमध्ये बाळाचे बाहय जनांग ज्या लिंगाशी जास्त मिळते जूळते असतात त्या लिंगाचे सेक्स क्रोमोसोम त्या बाळात असतात. खुप तुरळक वेळेस (1600 मधील एकाला) सेक्स क्रोमोसोम मध्ये बदल निदर्शसनास येत असतात जसे की XXY किंवा X किंवा XXX इत्यादी. परंतू असे बदल असणारे व्यक्ती तृतीयपंथी किंवा भिन्नलिंगी असतीलच असं काही नाही. किंवा असे बदल असणारे व्यक्ती इंटरसेक्स असतीलच असही काही नाही. (धुमाळ, 2023)

सामाजिक दृष्टीकोन :-

जर मुलगा मुलीसारखं वागायला लागला तर घरच्यांचा रोष त्याच्यावर ओढवतो हे वगळेपण बघून घरच्यांना घबरायला होतं. त्यांच्या मनात समाजाची भिती असते. या भितीचे रूपांतर रागात होतं, आणि मग मारहाण करणं, घरातून काढून टाकणं असे प्रकार सर्रास घडतात. काही पालक मुलाला मानसोपचारतज्ज्ञांकडे घेवून जातात.

काही लोक तर अंधश्रद्धेवर खूप अवलंबून असतात. कुणाच्या कुटुंबात जर असे बालक जन्माला आले तर त्यांनी मागील जन्मात पाप केलेले आहेत असे समजले जातात. व त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन चुकीचा असतो, त्या कुटुंबाला कोणत्याही कार्यक्रमात दुय्यम स्थान दिले जाते आणि त्याची हेटाळणी पावलो पावली होत असते.

मुलाचं बायकी वागणं बघून शाळा - कॉलेजमध्ये चेष्टा होऊ लागते. अनेकांना रॅगिंगला तोंड द्यावं लागतं. अशा अनेक मुलांचे लैगिंक शोषण होतं. त्यामुळे लैगिंक शोषण झाल्यामुळे तो/ती 'तसा' झाला. वयात आल्यावर काहिंच्या बाबतीत एक महत्वाची गोष्ट घडते. ती म्हणजे अनेक पुरूष अशा बायकी मुलांकडे आकर्षित होतात. इतर वेळी त्रास देणारे, कुचकटपणे बोलणारे परके पुरूष लैंगिक सुखासाठी ओळख काढू लागतात, खायला, प्यायला घालतात. नवीन कपडे भेट देतात यामुळे त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी बदलते. इतर पुरुषांसाठी 'लैंगिक उपभोग्य वस्तू' बनून त्यांना मिळविणे. समाजात संगनमताने लैंगिक उपभोग्य वस्तू म्हणून प्रतिमा बनते. (कुलकर्णी, 2023)

वैज्ञानिक दृष्टीकोन :-

निसर्गात घडणा-या प्रत्येक घटनेला एक वैज्ञानिक कार्यकारणभाव असतो. अशा व्यक्ती जन्माला येण्यामागे अतिशय गुंतागुंतीची कारणे आहेत. आतापर्यंत अशी समजूत होती की ही एक विकृती आहे. मात्र आता नवे संशोधन सिध्द करत आहे की, अशी वेगळी लैंगिक प्रवृत्ती ही विकृती नसून एक नैसर्गिक बाब आहे. ज्या क्षणी समागमानंतर स्त्री बीजाचे फलन होते,

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

त्या क्षणी गर्भाचे लिंग काय आहे हे ठरते. गर्भ तयार होतो त्या क्षणी जरी तो स्त्री कि पुरूष गर्भ हे ठरलेले असते, तरी गर्भात असतांना पहिले सहा आठवडे त्यांचे बाहय जननेंद्रिये सारखी दिसतात. त्यांचे स्वरूप सहा आठवडयानंतर बदलायला लागते. पुरूषत्व निर्माण करण्यात Y क्रोमासोम वरचा SRY gene जबाबदार असतो. पुरूष अँड्रोजेन व अेस्टोस्टेरोन स्त्रवते, हे पुरूषी स्त्राव काही कारणाने कमी प्रमाणात झाले तर समस्या उभी राहते. अशा व्यक्तीला जननेंद्रिये पुरूषी असतात. मात्र लिंगभाव स्त्रीसारखा उत्पन्न होतो. अनेकजन हिजडे होण्याचे हे एक कारण असू शकते. (कुलकर्णी, 2023) बाळ आईच्या पोटात असतांना हार्मोन्स च्या बदलामुळे तृतीयपंथी होवू शकते. गुणसुत्रातील जनुकांच्या बदलामूळेही होवू शकते, किंवा या मागे इतरही काही कारणे असू शकतात जी की अजूनही अज्ञात आहेत. बाळाच्या जन्माच्या वेळेस डॉक्टरांच्या लक्षात आल्यावर सदरील बाळाच्या सेक्स ऑर्गन्सची लगेच प्युबर्टी दरम्यान सर्जरी प्लॅन करण्यात येवू शकतो. ज्या सेक्स शी सदरील ऑर्गन्स जास्त मिळते जुळते असते त्याच सेक्स ऑर्गन्स मध्ये पुर्ण बदलून टाकण्यात येते.

XO, XXY अशी गुणसूत्रे असली तर, गडबड आणखीन वाढते. कधी अशी गडबड होते की लिंग पुरूषी तयार झाले तरी पुरूष संप्रेरक अँड्रोजेनची कमतरता असते. अशा व्यक्ती जन्माला येतात ते पुरूष म्हणून, पण त्यांचा लिंगभाव एखादया स्त्रीसारखा असतो. अनेकजण जे हिजडे म्हणून वावरतात त्याच्यात अशी प्रक्रिया होत असावी असे शास्त्र म्हणते. (कुलकर्णी, 2023)

व्याख्या:-
1) बिंदूमाधव खिरे:- “जो पूर्णपणे पूरूषही नाही व पूर्णपणे स्त्रीही नाही, तृतीयपंथी हा शब्द समाज स्त्रीच्या वेशात राहणाऱ्या पुरुषांना वापरतो.”

2) डॉ. अलका शशांक कुलकर्णी:- “तृतीयपंथी म्हणजे ‘वेगळया’ लैंगिक प्रवृत्ती हया विकृती नाहीत, त्या सहज, नैसर्गिक प्रकृती आहेत”.

साहित्य पुनरावलोकन **(Literature of review) :-**

1) **“**द थर्ड जेंडर” प्रथम आवृत्ती 2023 मध्ये डॉ. जळबा धुमाळ यांनी ट्रान्सजेंडर व्यक्तीची आणि समाजाची सर्वांगींण मांडणी सविस्तरपणे सांगीतलेली आहे. 2014 पर्यत 135 करोड लोकसंख्येमधुन 4 लाख तृतीयपंथी लोकांचे सर्व बाजूने शोषण केले जात होते. सर्व प्रस्थापित धर्म, सर्व प्रस्तापित समाजव्यवस्था, पोलिस प्रशासन, कायदा, मेडिकल फिल्ड, डॉक्टर्स, कायदयातील नियम व अटी इत्यादी दुस-या विरूध्द बाजूला होत्या. एवढया सगळया जणांकडून ट्रान्सजेंडर व्यक्तींची अवहेलना, छळ, शोषण, अत्याचार होत होता. आता कुठे 2014 पासून कायदा आणि प्रशासन सदरील व्यक्तींची, समाजाची दखल घेत आहे. त्यांच्या न्यायासाठी, हक्कासाठी, त्यांच्या संरक्षणासाठी नविन नियम, नविन कायदे बनत आहेत आणि जूने अन्यायकारक नियम व कायदे बदलले जात आहेत. यात प्रस्तापित समाज अजून मागेच आहे. एवढी लांब, एवढी अवघड, प्रचंड लढाई लढत आहेत. एवढया मोठया अजस्त्र शत्रुसमोर एवढया कमी संख्येने, एवढया जास्त वेळेपर्यत कुनीही उभ ठाकलं नसेल, लढायच आणि जिंकायच तर दुरच.

एवढ सगळ असूनही, एवढया अडचणी असूनही आज कितीतरी ट्रान्सजेंडर व्यक्ती न्यायाधीश आहेत, प्रिन्सिपाल आहेत, राजकीय नेत्या आहेत, मॉडेल आहेत, डॉक्टर आहेत, वक्ते आहेत, न्युज अॅकर आहेत, लेखक आहेत, बॉडी बिल्डर आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत आणि त्यांच्या त्यांच्या आयुष्यात यशस्वी आहेत. याचा अर्थ हाच की ट्रान्सजेंडर व्यक्ती आणि समाज ही लढाई आता जिंकत आलेले आहेत.

2) **“**प्राऊड टू बी अ ट्रान्सवुमन” श्रीमती कांदबरी शेख महिला पारलिंगी महिला, सामाजिक कार्यकर्ती अशी माझी ओळख आहे. 2024 मध्ये चेतक बुक्स प्रकाशन यामध्ये यांच्या जिवनातील खडतर प्रवास सदाशीव पेठ पासून सुरू होत आज

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पुणेमधील हडपसर पर्यत करतांना झालेली यातायात व प्रखर विरोध, हेटाळणी, अवहेलना नित्याचीच. मी विकृत, मनोरूग्न म्हणून संबोधले गेले. हिजडा, छक्का, गुड, मामू अशी दूषणे लावून हिणविण्यात आले.

मुलगा ते स्त्री माझ्या भावनांना स्त्री रूपाला हिजडा अशी ओळख मिळाली. या संपूर्ण प्रवासात अनेक हितचिंतक, निंदक, मित्र, शत्रू भेटले आणि सर्वच माझे प्रेरणास्त्रोत होत गेले. घरच्यांना व समाजांनी समजून न घेता हिजडा समाजात जाऊन सामाजिक कार्य करत आज अनेक सन्मानपत्रे, पुरस्कार प्राप्त झाले आहेत. असंख्य तृतीयपंथी लोकांची गुरू म्हणून कार्य करीत आहेत.

"तृतीयपंथीयाचा आवाज" अशी ओळख असणाऱ्या मराठी रंगभुमीवर पहिल्या "पारलिंगी" महिला अभिनेत्री नाटककार हा मान पटकविला आहे.

3) "मी हिजडा...मी लक्ष्मी!" 2014 मध्ये शब्दांकन वैशाली रोडे मनोविकास प्रकाशन पुणे येथे लक्ष्मीनारायण त्रिपाठी. तो लक्ष्मी ते ती लक्ष्मी पर्यतचा खडतर प्रवास यांचा संघर्ष मांडण्यात आला आहे. एक आजारी, शांत मुलगा, गप्प राहणारा कसा कुणाच्या लक्षात यावा, त्याचे लैंगिक शोषण तरीही तो गप्पच, कस कुणाला समजावं, त्याला जाणवणारं स्वतःमधलं स्त्रीत्व ते मात्र समाजाच्या नरजेत आलेल होत. गुणसुत्रांतील गोंधळामुळे लिंगनिष्चितीचा गोंधळ अस्तित्वात येतो. टर्नर सिंड्रोम, ॲन्ड्रोजन इनसेन्सिविटी सिंड्रोम इत्यादी दोश व संप्रेरकांच्या कमी अधिक प्रभावामुळे होणारे गोंघळ होत आहेत. टेस्टोस्टेरॉनच्या प्रभावामुळे न्यूनतेमुळे पुरुषी लिंग व लिंगभाव स्त्रीचा असे हिजडा जन्माला येतो. तेथे पुरुषाला स्त्रीप्रमाणे राहायला, वागायला आवडते. हावभाव, वर्तन, पेहराव, जोडीदाराची निवड, स्वजाणीव हे सारे अशा पुरूषाला स्त्रीप्रमाणे असते. कुंटूब सोबत असेल तर कोणतीही लढाई जिंकू शकतो.

सामाजिक कार्य करतांना "दाई वेल्फेअर सोसायटी" हिजडा म्हणून हिजडयांसाठी कार्य करतांना हया समस्या मांडल्या. मुंबई मधून सुरू झालेला प्रवास थेट जागतीक पातळीवर युएनए मध्ये पोहचला, सुप्रसिध्द डान्सर म्हणून ओळख निर्माण केली, इंडीयन सुपर क्विन च्या विजेत्या, सलमान खानसह दस का दम शो, व्हिएन्ना कॉन्फरन्स मध्ये परिसंवाद इ. अनेक कार्य व भुमिका पुर्ण केलेले आहेत.

4) "सप्तरंग" 2013 मध्ये समपथीक ट्रस्ट द्वारे बिंदूमाधव खिरे यांनी तृतीयपंथी व ट्रान्सजेंडर मुलामुलींच्या आत्मकथा यामध्ये सर्व तृतीयपंथी यांच्या प्राथमिक माहिती, आत्मकथा, लिंगाबद्दल शस्त्रक्रिया, तृतीयपंथी यांच्या मुलाखती, तृतीयपंथी यांचे कायदेविषयक अधिकार, यावर माहिती प्रकाशित झालेली आहे. 1998-1999 मध्ये अमेरीकेत असतांना 'त्रिकोण' या समलिंगी आधार संस्थेमध्ये त्यांच्यासारखे समलिंगी पुरूष भेटले. तेव्हा त्यांच्यासारखे अनेकांमुळे मनावरील दडपण कमी झाले. पुण्यात आल्यावर सप्टेंबर 2002 'समपथीक ट्रस्ट' ही संस्था समलिंगी, ट्रान्सजेंडर, इंटरसेक्स, तृतीयपंथी लोकांसाठी सुरू केली. या संस्थेचा उद्धेश होता की 'ड्रॉप इन सेंटर' चालवाव आणि या विषयाची शास्त्रीय माहिती द्यावी. 11 डिसेंबर 2011 ला पुण्यात पहिल्यांदा 'अभिमान मोर्चा' काढला. यामध्ये समलिंगी, ट्रान्सजेंडर, इंटरसेक्स, तृतीयपंथी यांच्यासाठी काहीतरी करावे, कारण अल्पसंख्याक समाजाची थट्टा, द्वेष करतात, त्यांना मुख्य प्रवाहातून बहिष्कृत करतात, त्यांची मानूस म्हणून समाजाला ओळख व्हावी या उद्धेशाने पुस्तकांची निर्मीती झाली. इंटरसेक्स, ट्रान्सजेंडर, समलिंगी, तृतीयपंथी या सर्व लैगिंक अल्पसंख्याकांचा सप्तरंगाचा झेंडा (रेनबो फ्लॅग) आहे. हे रंग सर्वाच्या आयुष्याचे वैविध्य दर्शवितात आणि म्हणूनच या पुस्तकाचे नाव 'सप्तरंग' ठेवण्यात आले.

5) "मन शुध्द तुझं" 2023 मध्ये डॉ. अलका शशांक कुलकर्णी यांनी हिजडा का जन्माला येतात यावर सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यांच्या तपासणीत असे अनेकदा होत होते की, जेव्हा 'पुरुषी' मूली आणि 'बायकी' मुलगे आले की त्यांचे व त्यांच्या पालकांचे गोंधळलेले चेहरे आणि लपवालपवी चे उत्तरे व चाचण्या करण्यास नकार देत होते. समाजाला सत्य समोर यायला

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

नको व आपली समाजात इज्जत कमी नको व्हायला यासाठी, परंतू त्याच्या मनातील न्युनगंड त्यांना त्यांच्या इच्छेनुसार जगता येत नव्हाता. त्यामुळे त्यांना पुर्ण आयुष्य घुटमळत जगावे लागत होते. त्यांना वाटायचे की हे फक्त वेगळी लिंगभावना असणे विकृती आहे आणि या विकृतीचा बिमोड केलाच पाहिजे. प्राचीन भारत आणि आशिया देशाने 'तृतीय' समाजाला स्विकारले होते. त्यांना समाजात स्थान दिले होते, त्यांना उदरनिर्वाह, उत्पन्नाची, चरितार्थाची मोकळीक होती. सर्वसामान्य लोकांपेक्षा ज्यांची वेगळी ओळख आहे त्यांना LGBTQIA+ म्हणतात.

उद्दीष्ट्ये (Objective) :-

1) जन्माच्या कारणांचा शोध घेवून तुतीयपंथी जन्माला येवू नये यावर अध्ययन करणे.

2) वैद्यकिय चाचणी दरम्यान हार्मोनल गुणसुत्रीय चाचणीचा परिणाम अभ्यासणे.

3) तृतीयपंथी लोकांबद्दल समाजात सलोख्याची भावणा निर्माण करण्यास भर देणे.

4) तृतीयपंथी लोकांच्या जैविक कारणांचा शोध घेणे.

गृहितके (Hypothesis) :-

1) सामाजिक नकार व भेदभावामुळे तृतीयपंथी यांच्यामध्ये मानसिक तणावांचे प्रमाण वाढते.
2) तृतीयपंथी व्यक्तीमध्ये लहान वयातच लैगिंक ओळखीबाबत स्पष्टता दिसून येते.
3) XX किंवा XY या गुणसुत्रांच्या व्यतीरीक्त आढळणाऱ्या जनुकांच्या बाबतीत भिन्नता दिसून येते.
4) गर्भावस्थेतील हार्मोनल असंतूलन तृतीयपंथी ओळख निर्माण करण्यास कारणीभूत ठरते.
5) समाजात प्रचलित असलेले अंधश्रध्दा व गैरसमज तृतीयपंथीयांच्या जन्म कारणावि षयी चुकीचा समज निर्माण करतात.
6) शिक्षणाच्या अभावामुळे तृतीयपंथी यांच्या जन्माविषयी वैज्ञानिक कारणांची माहिती समाजाला नसते.

संशोधन पध्दती (Research Methodology) %&

तृतीयपंथीयांच्या जन्म कारणांचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाचे कार्यक्षेत्र विदर्भातील पाच जिल्हयामधील आहे. सदर आराखडा हा पुर्णतः द्वितीयक सामग्रीवर अवलंबून आहे. यासाठी क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, इंटरनेट, दैनिक पेपर मधील माहिती इत्यादी माध्यमांचा आधार घेतलेला आहे.

दृष्टीकोन (Perspective):

1)सामाजिक अज्ञान, अंधश्रध्दा व गैरसमज यामुळे तृतीयपंथीयांच्या जन्माबाबत चुकीचे समज निर्माण होतात. ज्यांचा त्यांच्यावर सामाजिक बहिष्काराच्या रूपात परीणाम होतो.

2) योग्य व वैज्ञानिक शिक्षण मिळाले तर या घटकांबाबत नकारात्मक दृष्टीकोन बदलू शकतो.

3)वैद्यकीय दृष्टीने तृतीयपंथी असणे म्हणजे रोग नाही. जागतिक (WHO) देखील तृतीयपंथी ओळख ही मानसिक विकार नाही असे स्पष्ट होते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

निष्कर्ष (Conclusion) :

या संशोधनातून हे स्पष्ट होते की, तृतीयपंथी हा मनोविकार किंवा सामाजिक भ्रम नसून तो एक जन्मजात व नैसर्गिक प्रक्रिया आहे. हार्मोनल बदल, जैविक व गुणसुत्रिय घटकांचा त्यामध्ये महत्वाचा वाटा आहे. तृतीयपंथी हे विकृती नसून ते समाजाचा एक भाग म्हणून स्विकारणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेवर योग्य परिणाम होवून त्यांना समाजात सन्मानाने जगण्यास संधी मिळेल. सोबतच पालकांना समाजात वावरतांना घुटमळत जगण्याची गरज पडणार नाही.

गर्भ लिंग चाचणी दरम्यान जर गर्भामध्ये अर्भक ABNORMAL असेल तर अश्या वेळी डॉक्टर यांनी कळविले तर योग्य उपचार करून त्या अर्भकाला निरोगी जन्म घेता येणार . त्यामुळे आई वडील किंवा त्याला समाजात मान खाली घालून जगण्याची वेळ येणार नाही . तृतीयपंथी समाजाला समागम करतांना घ्यावयाची काळजी घेतल्यामुळे तृतीयपंथी जन्माला येणार नाही. किंवा जन्माला आलेच तर समाजाने स्विकृती दयावी. सोबतच तृतीयपंथीयांना मानवी हक्क, समता, सन्मान, मिळावे याकरीता हे संशोधन महत्वाचे ठरेल व अशा संशोधनाची आज गरज सुद्धा आहे.

संदर्भग्रंथ (References)

1) त्रिपाठी लक्ष्मीनारायण, शब्दांकन-वैशाली रोडे, (2014) मी हिजडा...मी लक्ष्मी! मनोविकास प्रकाशन पुणे
2) खिरे, बिंदूमाधव (2013) सप्तरंग तृतीयपंथी व ट्रान्सजेन्डर मुलामुलींच्या आत्मकथा समपॅथीक ट्रस्ट पूणे
3) श्रीमती कांदबरी, शब्दाकंन - सोनल गोडबोले, (2024) प्राऊड टू बी अ ट्रान्सवुमन चेतक बुक पुणे
4) डॉ. धुमाळ, जळबा (2023) द थर्ड जेंडर प्रकाषक, मुद्रक, वितरक डॉ. धुमाल जळबा
5) डॉ. अलका शशांक कुलकर्णी, (2023) मन शुद्ध तुझं डिंपल पब्लिकेशन पालघर
6) www.inmarathi.com
7) https://shodhganga.inflibnet.ac.in